आरबीआय/२०१२-१३/९८
आयडीएमडी.पीसीडी ०३/१४.०१.०१/२०१२-१३ जुलै २, २०१२

**अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सर्व अनुसूचित वाणिज्य बँका(आरआरबी सोडून)/**
**सहकारी बँका/प्राथमिक डीलर्स**

महोदय/महोदया,

**कॉल/नोटिस मनी मार्केट व्यवहार या वरील महापरिपत्रक**

भारतीय रिझर्व बँकेने, बँका व प्राथमिक डीलर्सना, कॉल/नोटिस मनीमार्केट संबंधाने, वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश दिले आहेत. अर्हताप्राप्त संस्थांना विद्यमान सूचना एकाच ठिकाणी मिळाव्यात ह्यासाठी, बाजारात भाग घेणारांच्या व इतर संबंधितांच्या संदर्भासाठी ह्या विषयावरील सर्व विद्यमान मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश एकत्रित करुन हे महापरिपत्रक तयार करण्यात आले आहे. येथे नोंद घ्यावी की, ह्या महापरिपत्रकात, ह्या विषयाशी संबंधित असलेल्या तसेच जोडपत्रात असलेल्या परिपत्रकांमधील, कॉल/नोटिस मनी मार्केटमध्ये भाग घेणाऱ्या सत्पात्र संस्थांच्या व्यवहारांसंबंधीची मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश एकत्रित करण्यात आले आहेत. हे महापरिपत्रक आरबीआयच्या www.mastercirculars.rbi.org.in ह्या वेबसाईटवरही टाकण्यात आले आहे.

आपला,

(के.के.व्होरा)
मुख्य महाव्यवस्थापक,

सोबत - वरील प्रमाणे

| **अनुक्रमांक** | | |
| --- | --- | --- |
| **अनु.क्र.** | **विषय** | **पेज नं.** |
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | सहभागी | ३ |
| ३ | प्रुडेंशियल मर्यादा | ३ |
| ४ | व्याजदर | ४ |
| ५ | व्यवहार-सत्र | ४ |
| ६ | कागदपत्रे | ४ |
| ७ | अहवाल-आवश्यकता | ४ |
| | जोडपत्रे | |
| | १) कॉल/नोटिस मनीमार्केटमध्ये परवानगीप्राप्त असलेल्या संस्थांची यादी | ६ |
| | २) अहवाल पाठविण्याचा नमुना | ७ |
| | ३) व्याख्या | ८ |
| | परिशिष्ट : एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी | ९ |

## १. प्रस्तावना

पैशांचा खूप जवळचा पर्याय (सबस्टिट्युट) असलेल्या लघु मुदतीच्या वित्तीय ॲसेटचे मार्केट म्हणजे मनी मार्केट संलेखाचे सर्वात महत्वाचे लक्षण म्हणजे ते तरल (लिक्विड) असते व कमी खर्चात त्याचे पैशांमध्ये रुपांतर करता येते आणि त्याचबरोबर धनकोंचे लघु मुदतीचे अतिरिक्त निधी आणि ऋणकोंची गरज ह्यात समतोल आणण्याचा एक मार्ग उपलब्ध करते. असे कॉल/नोटिस मनी मार्केट भारतीय नाणे बाजाराचा एक महत्वाचा भाग ठरते. कॉल मनी मार्केटखाली निधींचा व्यवहार रात्रभराच्या धर्तीवर केला जातो आणि नोटिस मनी मार्केटखाली निधींचा व्यवहार २ ते १४ दिवसांच्या कालावधीत केला जातो.

## २. सहभागी

कॉल/नोटिस मनी मार्केटमधील सध्याचे सहभागी म्हणजे अनुसूचित वाणिज्य बँका (आर आर बी सोडून), सहकारी बँका (भूविकास बँका सोडून) व प्राथमिक डीलर्स (धनको व ऋणको अशा दोन्हीही नात्यांनी) **(जोडपत्र -१)**

## ३. प्रुडेंशियल मर्यादा

३.१ अनुसूचित वाणिज्य बँका, सहकारी बँका व पीडींसाठी, कॉल/नोटिस मनी मार्केटमधील कर्ज घेणे व देणे ह्यातील आउटस्टँडिंग व्यवहारां संबंधीच्या प्रुडेंशियल मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत :-

**कोष्टक : कॉल/नोटीस मनी मार्केटमधील व्यवहारांसाठी प्रुडेंशियल मर्यादा**

| अनु .क्र. | सहभागी | कर्ज घेणे | कर्जाऊ देणे |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित वाणिज्य बँका | पंधरवड्याच्या सरासरी धर्तीवर, कर्ज घेण्याबाबतचे आउटस्टँडिंग अगदी अलिकडील ताळेबंदामधील भांडवली निधीच्या १००% पेक्षा अधिक असू नये (म्हणजे टियर १ व टियर २ ची बेरीज) तथापि, एखाद्या पंधरवड्यात, बँकांना त्यांच्या भांडवली निधीच्या १२५% कोणत्याही दिवशी कर्ज घेण्याची परवानगी आहे. | पंधरवड्याच्या सरासरी धर्तीवर, कर्ज देण्याबाबतचे आउटस्टँडिंग, त्यांच्या भांडवली निधीच्या २५% पेक्षा अधिक असू नये. तथापि एखाद्या पंधरवड्याच्या, कोणत्याही दिवशी बँकांना त्यांच्या भांडवली निधी ५०% कर्ज देण्यास परवानगी आहे. |
| २ | सहकारी बँक | राज्य सरकारी बँका/जिल्हा केंद्रीय सहकारी बँका/नागरी सहकारी बँकांचे, कॉल/नोटिस मनी मार्केटमध्ये, दररोजचे आउटस्टँडिंग कर्ज घेणे हे त्यांच्या मागील वित्तीय वर्षाच्या मार्च अखेरीस असलेल्या एकूण ठेवींच्या २.०% पेक्षा अधिक असू नये. | कोणतीही मर्यादा नाही. |
| ३ | पीडी | अहवालाच्या पंधरवड्यामध्ये, पीडींना सरासरीने, मागील वित्तीय वर्षाच्या मार्च अखेरीस असलेल्या त्यांच्या नक्त निज निधीच्या २२५ टक्के कर्ज घेण्यास परवानगी आहे. | कॉल/नोटिस मनी मार्केट मध्ये, पीडींना अहवालाच्या पंधरवड्यात सरासरीने त्यांच्या एनओएफच्या २५ टक्के कर्ज देण्यास परवानगी आहे. |

३.२ बँक नसलेल्या संस्थांना (पीडी सोडून) कॉल/नोटिस मनी मार्केटमध्ये भाग घेण्यास परवानगी नाही.

**४. व्याज दर**

४.१ कॉल/नॉटिस मनी मार्केटमधील व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य अर्हताप्राप्त सहभागींना देण्यात आली आहे.
४.२ देय असलेले व्याज काढण्यासाठी, फिक्स्ड इनकम मनी मार्केट अँड डेरिवेटिवज् असोशिएशन ऑफ इंडिया (एफआयएमएमडीए) ह्यांनी तयार केलेल्या हँडबुक ऑफ मार्केट प्रॅक्टिसेसचा आधार घेतला जावा.

**५. व्यवहार सत्र (डीलिंग सेशन)**

कॉल/नोटिस मनी मार्केटमधील व्यवहार आठवड्यातील कामाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत व शनिवारी दुपारी २.३० वाजेपर्यंत किंवा आरबीआयने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे केले जावेत.

**६. कागदपत्रे (डॉक्युमेंटेशन)**

अर्हताप्राप्त सहभागींनी एफआयएमएमडीएने वेळोवेळी सूचित केलेल्या कागदपत्रांचा अवलंब करावा.

**७. अहवाल - आवश्यकता**

७.१ निगोशिएटेड डीलिंग सिस्टिम कॉल म्हणजे एनडीएस - कॉलवरील (एक स्क्रीन आधारित, निगोशिएटेड, कोट-ड्रिव्हन प्रणाली), कॉल/नोटिस मनी मधील सर्व व्यवहारांसाठी वेगवेगळ्या अहवालाची आवश्यकता नाही. एनडीएसच्या सर्व सभासदांसाठी, एनडीएस-कॉलवर केलेले व्यवहार सोडून, कॉल/नोटिस मनी मार्केटमधील त्यांचे व्यवहार एनडीएसवर कळविणे अपरिहार्य करण्यात आले आहे. व्यवहाराचे आकारमान कितीही असले तरी किंवा विरुध्द पक्ष एनडीएसचा सभासद असो किंवा नसो, सर्व व्यवहार, ते केल्यानंतर १५ मिनिटांच्या आत, एनडीएसवर कळविले गेले पाहिजेत, एखाद्या एनडीएस सभासदाकडून असे व्यवहार वारंवार कळविले न गेल्यास असे न कळविलेले व्यवहार अवैध समजले जातील.

७.२ एनडीएसवरील अहवाल पाठविण्याची वेळ आठवड्यातील कामांच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत व शनिवारी दुपारी २.३० वाजेपर्यंत किंवा आरबीआयने वेळोवेळी ठरविल्यानुसार असेल.

७.३ कॉल/नोटिस/टर्म मनी व्यवहारांचे अहवाल पाठविण्याबाबत स्थिरता आल्यामुळे, डिसेंबर ११, २००४ पासून, कॉल/नोटिस/टर्म मनी व्यवहार रिझर्व बँकेला फॅक्सने कळविणे बंद करण्यात आले आहे. तथापि एनडीएसचे सभासद नसलेल्यांनी केलेले व्यवहार, पूर्वीप्रमाणेच, आरबीआयच्या फायनान्शियल मार्केट्स विभागाला (एफएमडी) फॅक्सने कळविले जाणे सुरुच राहील.**(जोडपत्र - २)**

७.४ तशीच वेळ आल्यास मनी मार्केटमधील व्यवहारांची माहिती सहभागींनी फॅक्सने पाठविण्यासाठी रिझर्व बँक सांगू शकते.

***

**जोडपत्र – १**
**(परिच्छेद २ पहा)**

**१. कॉल/नोटिस मनी मार्केटमध्ये धनको व ऋणको अशा दोन्हीही नात्यांनी भाग घेण्यास परवानगी असलेल्या सहभागींची यादी.**

अ) अनुसूचित वाणिज्य बँका (प्रादेशिक ग्रामीण बँक सोडून);
ब) भू विकास बँका सोडून इतर सहकारी बँका; आणि
क) प्राथमिक डीलर्स

**जोडपत्र - २**
**(परिच्छेद ७.३ पहा)**

## कॉल/नोटिस/टर्म मनी मार्केट व्यवहारांवरील दैनिक अहवाल

प्रति
मुख्य महाव्यवस्थापक,
रिझर्व बँक ऑफ इंडिया
आर्थिक बाजार विभाग,
२३ व्या मजला, केंद्रीय कार्यालय,
मुंबई-४००००१,
फॅक्स-९१-२२-२२६३०९८१
बँक/संस्थेचे नाव :-----------------------------------
कोड क्र. (आरबीआयने विहित केलेला) :----------------------------------------
दिनांक : :-------------------------

| | **कर्ज घेणे** | | | **कर्जाऊ देणे** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **रक्कम (रु करोड)** | ***व्याजदराची मर्यादा (% वार्षिक)*** | ***तुलनात्मक सरासरी व्याजदर (% वार्षिक)*** | **रक्कम (रु करोड)** | ***व्याजदराची मर्यादा (% वार्षिक)*** | ***तुलनात्मक सरासरी व्याजदर (% वार्षिक)*** |
| १. कॉल मनी (रात्रंदिवस) | | | | | | |
| २. नोटिस मनी (२-१४ दिवस) | | | | | | |
| अ)व्यवहाराच्या दिवस | | | | | | |
| ब) आउटस्टँडिंग़* (व्यवहाराच्या दिवस सहित) | | | | | | |
| ३) टर्म मनी @ (अ) व्यवहाराच्या दिवस | | | | | | |
| (१५ दिवस-१ महिना) | | | | | | |
| १ महिना-३ महिने | | | | | | |
| ३ महिने-६ महिने | | | | | | |
| ६ महिने-१ वर्ष | | | | | | |

ब) आउटस्टँडिंगच्या* बाबतीत दर दिला नाही तरी चालेल.

**रक्कम कर्ज घेणे**

| | |
|---|---|
| (१५ दिवस-१ महिना) | |
| १ महिना-३ महिने | |
| ३ महिने-६ महिने | |
| ६ महिने-१ वर्ष | |

**कर्जाऊ देणे**

| |
|---|
| |
| |
| |
| |

**रक्कम**

आउटस्टँडिंगच्या* बाबतीत दर दिला नाही तरी चालेल.

@ लागु असेल.

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

**जोडपत्र ३**

**व्याख्या**

अन्यथा संदर्भ नसल्यास ह्या मार्गदर्शक तत्वांमध्येः

१) 'कॉल मनी' म्हणजे, ओव्हरनाईट फंडांमधील व्यवहार
२) 'नोटिस मनी' म्हणजे, २-१४ दिवसांसाठी निधीमधील व्यवहार
३) 'टर्म मनी' म्हणजे, १५ दिवस ते १ वर्षासाठी केलेले निधीमधील व्यवहार
४) 'पंधरवडा' हा अहवाल पाठविण्याच्या शुक्रवारच्या धर्तीवर असेल व त्याचा कालावधी शनिवार ते पुढील दुसऱ्या शुक्रवारपर्यंत (दोन्हीही दिवस समाविष्ट) असेल.
५) 'बँक' किंवा 'बँकिंग कंपनी' म्हणजे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९(१९४९ चा १०) च्या कलम ५ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केलेली बँकिंग कंपनी (एनडी) मध्ये व्याख्या अनुक्रमे खंड (डीए), खंड(एनसी) आणि खंड (एनडी) मध्ये व्याख्या केल्यानुसार 'कॉरेस्पाँडिंग न्यु बँक', भारतीय स्टेट बँक' किंवा 'सबसिडिअरी बँक', आणि ''को-ऑपरेटिव्ह बँक''खंड (सीसीआय) ह्या अधिनियमाच्या कलम ५६ सह वाचित असेल.
६) 'अनुसूचित बँक' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या दुसऱ्या शेड्युलमध्ये समाविष्ट केलेली बँक
७) 'प्राथमिक डीलर (पीडी)' म्हणजे, 'गाईडलाईन्स फॉर पीडीज् इन गव्हर्मेंट सिक्युरिटी मार्केट्स' दि. मार्च २९, १९९५ (वेळोवेळी सुधारित) अनुसार रिझर्व बँकेने एक पीडी म्हणून वैध प्राधिकृत पत्र दिलेली वित्तीय संस्था.
८) 'भांडवली निधी' म्हणजे, त्या संस्थेच्या अगदी अलिकडील ऑडिटेड ताळेबंदातील टियर १ व टियर २ भांडवलांची बेरीज.
९) आरबीआय अधिनियम १९३४ अनुसार पीडींसाठी एनओएफ पुढीलप्रमाणे काढला जातो (अ) त्या कंपनीच्या अलिकडील ताळेबंदामध्ये दाखविलेल्या एकूण भरणा झालेले इक्विटी भांडवल व मुक्त राखीव निधी वजा-(१) संचयित बॅलन्स ऑफ लॉस (२) डिफर्ड रेव्हेन्यु एक्सपेंडिचर आणि (३) इतर अमूर्त ॲसेट्स आणि (ब) ह्याशिवाय वजा पुढील रक्कम-(१) त्या कंपनीची- (१) दुय्यम कंपनीतील गुंतवणुक (२) त्याच गटातील कंपन्यांमधील गुंतवणुक ३) इतर सर्व अबँकीय कंपन्या आणि २) १) अशा कंपन्यांच्या दुय्यम संस्था आणि २) त्याच कंपनी गटातील कंपन्या ह्यांना दिलेल्या व त्यात ठेव ठेवलेल्या, डिबेंचर्स, बाँडस्, थकित कर्जे व अग्रिम राशी (हायर परचेस व लीज अर्थसहाय्या सह) ह्यांचे पुस्तकी मूल्य- मात्र अशी रक्कम वरील (अ) च्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक असल्यासच.

***

**परिशिष्ट**
**एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी**

| अनु क्र. | परिपत्रक क्रमांक | विषय |
|---|---|---|
| १. | सीपीसी.बीसी.१०३/२७९ए-९० दिनांक.१२-४-१९९० | कॉल मनी मार्केटमध्ये प्रवेश. |
| २. | संदर्भ.डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.९७/सी.३४७-९० दिनांक एप्रिल १८, १९९० | |
| ३. | सीपीसी.बीसी..१११/२७९ए -९१ दिनांक.१२-४-१९९१ | कॉल/नोटिस अँड बिल रिडिस्काउंटिंग मार्केट |
| ४. | सीपीसी.बीसी..१४४/०७.०१.२७९/९४-९५ दिनांक.१७-४-१९९५ | कॉल/नोटिस मनी मार्केट मधील प्रवेश-विस्तार |
| ५. | संदर्भ.डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.६८/२४.९१.००१-९५ दिनांक जुन २७, १९९५ | |
| ६. | सीपीसी.बीसी..१६२/०७.०१.२७९/९६-९७ दिनांक एप्रिल १५, १९९७ | मनी मार्केट डीएफएचआय मार्फत व्यवहार पाठविणे. |
| ७. | सीपीसी.बीसी..१६५/०७.०१.२७९/९७-९८ दिनांक. एप्रिल २१, १९९७ | मनी मार्केट - प्राथमिक डीलर्स मार्फत व्यवहार करणे. |
| ८. | सीपीसी.बीसी..१७५/०७.०१.२७९/९७-९८ दिनांक एप्रिल २९, १९९८ | मनी मार्केट |
| ९. | सीपीसी.बीसी..१८५/०७.०१.२७९/९८-९९ दिनांक एप्रिल २०, १९९९ | मनी मार्केटचा विकास करण्यासाठी उपाय - कॉल/नोटिस मनी मार्केट |
| १०. | संदर्भ.क्र.एमपीडी.२७८५/२७९ ए (एमएम)/९८-९९ दिनांक एप्रिल २४, १९९९ | कॉल/नोटिस मनी व बिल्स रिडिस्काउंटिंग मार्केट्स - व्यवहार पाठविणे. |
| ११. | सीपीसी.बीसी..१९०/०७.०१.२७९/९९-२००० दिनांक ऑक्टोबर २९, १९९९ | मनी मार्केट |
| १२. | सीपीसी.बीसी..१९६/०७.०१.२७९/९९-२००० दिनांक एप्रिल २७, २००० | मनी मार्केट |
| १३. | संदर्भ.क्र.एमपीडी.३५१३/२७९ ए (एमएम)/१९९९-२००० दिनांक एप्रिल २८, २००० | कॉल/नोटिस मनी आणि बिल्स रिडिस्काउंटिंग मार्केट्स-२०००-०१ वर्षासाठीच्या नाणी व कर्ज विषयक धोरणावरील निवेदनाचे ट्रँझॅक्शन एक्सट्रॅक्ट्स पाठविणे. |
| १४. | एमपीडी. बीसी.२०१/०७.०१.२७९/२०००-०१ दिनांक ऑक्टोबर १०, २००० | कॉल मनी मार्केटमध्ये कर्ज देण्यास बँक नसलेल्यांना परवानगी |
| १५. | एमपीडी. बीसी.२०६/०७.०१.२७९/२०००-०१ दिनांक एप्रिल १९, २००० | प्युअर इंटर-बँक कॉल मनी मार्केटकडे वाटचाल |
| १६. | डीएस.पीसीबी.सीआयआर.४०/१३.०१.००/२०००-०१ दिनांक एप्रिल १९, २००१ | कॉल मनी मार्केटमधील ऑपरेशन्स |
| १७. | एमपीडी.२९९१/०३.०९.०१/२०००-०१ दिनांक एप्रिल २१, २००१ | कॉल मनी मार्केटमध्ये भाग घेणे. |

| | | |
|---|---|---|
| १८. | एमपीडी.३१७३/०३.०९.०१/२०००-०१ दिनांक मे ८, २००१ | कॉल मनी मार्केटमध्ये भाग घेणे. |
| १९. | संदर्भ.डीबीओडी.क्र.एफएससी. बीसी.१२५/२४.९२.००१/२०००-०१ दिनांक मे २५, २००१ | कॉल/नोटिस/टर्म मनी मार्केटमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी व बिल रिडिस्काउंटिंग योजना-प्राथमिक डीलर्स |
| २०. | एमपीडी.बीसी.२१४/०७.०१.२७९/२००१-०२ दिनांक एप्रिल २९, २००२ | मनी मार्केट-प्युअर इंटर-बँक कॉल मनी मार्केटकडे वाटचाल |
| २१. | डीएस.पीसीबी.सीआयआर.५२/१३.०१.००/२००१-०२ दिनांक जुन २४, २००२ | कॉल मनी मार्केट व्यवहार कळविणे. |
| २२. | एमपीडी.२१७/०७.०१.२७९/२००१-०२ दिनांक जुन २७, २००२ | कॉल/नोटिस मनी मार्केटवर अवलंबून राहणे : प्रुडेंशियल नॉर्म्स |
| २३. | एमपीडी.२२०/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक जुलै ३१, २००२ | प्राथमिक डीलर्ससाठी कॉल/नोटिस मनी मार्केटात प्रवेश : प्रुडेंशियल नॉर्म्स |
| २४. | एमपीडी.२२२/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक ऑक्टोबर २९, २००२ | मनी मार्केट |
| २५. | एमपीडी.२२५/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक नोव्हेंबर १४, २००२ | कॉल/नोटिस मनी मार्केटवर अवलंबून राहणे : प्रुडेंशियल नॉर्म्स |
| २६. | एमपीडी.२२६/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक डिसेंबर ११, २००२ | कॉल/नोटिस मनी मार्केटवर अवलंबून राहणे : प्रुडेंशियल नॉर्म्स |
| २७. | डीबीओडी.एफएससी.बीसी.८५/२४.९१.००१/२००२-०३ दिनांक मार्च २६, २००३ | कॉल/नोटिस मनी मार्केट व बिल्स रिडिस्काउंटिंग योजनेत भाग घेण्याची परवानगी : खाजगी क्षेत्रातील म्युच्युअल फंड्स |
| २८. | डीबीओडी.एफएससी.बीसी.८६/२४.९१.००१/२००२-०३ दिनांक मार्च २६, २००३ | कॉल/नोटिस/टर्म मनी मार्केट व बिल्स रिडिस्काउंटिंग योजनेत भाग घेण्याची परवानगीः |
| २९. | एमपीडी.बीसी.२३०/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक एप्रिल २९, २००२ | मनी मार्केट-प्युअर इंटर-बँक कॉल मनी मार्केटकडे वाटचाल |
| ३०. | एमपीडी.बीसी.२३४/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक एप्रिल २९, २००३ | कॉल/नोटिस मनी मार्केटमध्ये अबँकीय संस्थांनी भाग घेणे. |
| ३१. | एमपीडी.बीसी.२३५/०७.०१.२७९/२००२-०३ दिनांक एप्रिल २९, २००३ | कॉल/नोटिस मनी मार्केट चे व्यवहार एनडीएस प्लॅटफॉर्मवर कळविणे |
| ३२. | एमपीडी.बीसी.२४१/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक नोव्हेंबर ३, २००३ | मनी मार्केट-प्युअर इंटर-बँक कॉल/नोटिस मनी मार्केटकडे वाटचाल |
| ३३. | एमपीडी.बीसी.२४४/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक नोव्हेंबर ५, २००३ | प्राथमिक डीलर्सचा कॉल/नोटिस मनी मार्केटमध्ये प्रवेश |
| ३४. | एमपीडी.बीसी.२४२/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक नोव्हेंबर ५, २००३ | प्युअर इंटर-बँक कॉल/नोटिस मनी मार्केटकडे वाटचाल |
| ३५. | एमपीडी.बीसी.२५०/०७.०१.२७९/२००३-०४ दिनांक मे २५, २००४ | प्युअर इंटर-बँक कॉल/नोटिस मनी मार्केटकडे वाटचाल |
| ३६. | एमपीडी.बीसी.२५३/०७.०१.२७९/२००४-०५ दिनांक जुलै ३, २००५. | कॉल/नोटिस मनी मार्केट ऑपरेशन्स वरील महापरिपत्रक |
| ३७. | एमपीडी.बीसी.२५९/०७.०१.२७९/२००४-०५ दिनांक ऑक्टोबर | प्युअर इंटर-बँक कॉल/नोटिस मनी |

| | | |
|---|---|---|
| | २६, २००४. | मार्केटकडे वाटचाल |
| ३८. | एमपीडी.बीसी.२६०/०७.०१.२७९/२००४-०५ दिनांक डिसेंबर १०, २००४. | कॉल/नोटिस मनी मार्केटचे व्यवहार कळविणे |
| ३९. | एमपीडी.बीसी.२६५/०७.०१.२७९/२००४-०५ दिनांक एप्रिल २९, २००५. | कॉल/नोटिस मनी मार्केटः रिव्हयु बेंच मार्क |
| ४०. | एमपीडी.बीसी.२६६/०७.०१.२७९/२००४-०५ दिनांक एप्रिल २९, २००५. | कॉल/नोटिस मनी मार्केट मध्ये भाग घेणे |
| ४१ | आयडीएमडी.पीडीआरडी.क्र. १०९६/ ०३.६४.००/ २००९-१० दिनांक सप्टेंबर ०२, २००९ | स्टँड अलोन प्राथमिक डीलर्सःकॉल/नोटिस मनी कर्जाऊ घेण्याची मर्यादा वाढविणे. |

***